१६)

क] अधिसूचनेचा मतितार्थ जाहीररित्या स्थानिक सोईस्कर ठिकाणी प्रसिध्द केला त्याचा तपशील.

	ठिकाण	प्रसिध्दीची तारीख
१]	मिरज कार्यालय	९.१२.१९८५
२]	तहसिल कार्यालय वाळवा	१३.१२.१९८५
३]	मौजे येलूर गांवचे नोटीस बोर्डवर	९.२.१९८६
४]	जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली	-

[४] अंतिमरित्या संपादनासाठी सुचित केलेल्या जमिनीचा तपशील.
गांव मौजे येलूर, ता. वाळवा, जि. सांगली येथील जमिनी.

सर्व्हे / गट नंबर		संपादनाचे क्षेत्र हे. आर
१] १२९१ ~~पैकी~~ पैकी		०.७५
	खराबा	०.०७
२] १३९५ पैकी		०.४६
	एकूण	१.२८

[५] निवाड्याची कारणे

संचालक, पुनर्वसन महाराष्ट्र राज्य यांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा पुनर्वसन अधिकारी सांगली हे संपादन मंडळ या नात्याने त्यांचेकडील पत्र नं. पुनर्वसन/आरआर/३४[२] दिनांक ७.६.१९८४ ने गांव येलूर, ता.वाळवा, जि.सांगली येथील जमिनी वारणा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादन कराव्यांत म्हणून प्रस्ताव क्रमांक १८३ दिनांक ७.६.१९८४ ने विशेष भूमी संपादन अधिकारी नं. ११ सांगली यांचेकडे भू संपादनाची कारवाई सुरळीत करावी म्हणून पाठविला. प्रस्तावामध्ये भूसंपादनासाठी दाखविलेले कारण सार्वजनिक जनतेच्या हितासाठी आहे. म्हणून सार्वजनिक हितासाठी भूसंपादन करणे गरजेचे व निकडीचे आहे.

मा.आयुक्त पुणे विभाग , पुणे यांनी त्यांचेकडील भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसुचना नं. भूसं/आरआर १२७६/सां. ८५ ने महाराष्ट्र राज्याचे राजपत्रांत पुणे विभागातून पान नं. २७५० दिनांक ७.११.१९८५ ने प्रसिध्द झाली. सदर अधिसुचनेद्वारे असे जाहीर केले आहे की, अधिसुचनेच्या सुचित जाहीर केलेल्या जमिनी ह्या वारणा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादन करणे जरूर आहे आणि विशेष भूसंपादन अधिकारी नं. ११ सांगली यांची भूसंपादन कायदा १८९४ कलम "क" अन्वये नेमणूक केली असून त्यांना जिल्हाधिकारी यांचे भूसंपादनाचे कामी कारवाईकरणेचे अधिकार प्रदान केले आहेत. म्हणून विशेष भू संपादन अधिकारी नं. ११ सांगली हे उक्त जमिनीचे संपादन करणेसाठी करावी लागणारी कार्यवाही करणेस सक्षम आहेत. सदर भूसंपादन कायदा कलम ७ प्रमाणे भूसंपादन अधिकारी हे सक्षम आहेत.

103

प्रस्तुत प्रकरणांत भूसंपादनाखाली समाविष्ठ असलेले क्षेत्र

संपादनाखाली असलेल्या जमिनीचा तपशील.

अ. नं.	सर्व्हे / गट नंबर	क्षेत्र हे. आर	आकार रुपये पैसे
१]	१२९१ पैकी	०.७५ खराबा ०.०७	२.८१
२]	१२९५ पैकी	०.४६	०.८०

भूसंपादनाखाली असलेल्या जमिनीची संयुक्त मोजणी सर्व्हे खातेच्या व संपादक मंडळाचे प्रतिनिधी समक्ष करणेत आली आहे. मोजणीचा निष्कर्ष मोजणीपत्रक व संयुक्त मोजणी दाखल्यात नमूद केला आहे. कोणत्याही हितसंबंधी इसमाने अशा त-हेने मोजणी केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळाविषयी आक्षेप घेतले नाहीत. म्हणून संपादित जमिनीचे संयुक्त मोजणी दाखल्यामध्ये दाखविलेले क्षेत्र हेच संपादनाखालील जमिनीचे खरे क्षेत्रफळ आहे असे नुकसान भरपाई देवविताना विचारात घतले आहे. शिवाय सदरचे क्षेत्र गा. न. नं. ७/१२ मध्ये दाखविले क्षेत्राशी मिळतेजुळते आहे.

३] भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसूचना प्रसिध्द झालेनंतर भूसंपादन कायदा कलम ९ [१],[२] ची जाहीर नोटीस भूसंपादन कार्यालय, गांवची चावडी, तहसिल कार्यालय व संपादित जमिनीवर व जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रसिध्द केली. त्याचप्रमाणे सदर कायदयाचे कलम ९ [३],[४]प्रमाणे हितसंबंधी इसमाना वैयक्तिक नोटीसा बजावल्या. सदर नोटीसाद्वारे त्यांना संपादित जमिनीचे नुकसान भरपाईचे हक्कासंबंधी सदर कायदयाचे कलम ८ प्रमाणे केले मोजणीबाबत अगर अन्य हक्काबद्दल जर कांही आक्षेप व हरकती असल्यास त्या घ्याव्यात. नेमले तारखेस नोटीसा बजावूनही संबंधी इसमानी आपल्या हरकती / आक्षेप दिले नाहीत.

कोणाही अर्जदाराने नोटीसा मिळलेनंतर प्रस्तावित भूसंपादनाविषयी आपले आक्षेप सादर केले नाहीत.

मालकी हक्क

संपादनाखालील जमिनीच्या ७/१२ प्रमाणे अधिकार अभिलेखात असलेल्या नोंदी हया मालकीहक्क ठरविणेबाबत प्रमाणभूत धरणेत आल्या आहेत. मालकी हक्का-संबंधी कोणताही वादविवाद अगर तक्रार नाही.

संपादनाखालील जमिनीचे ठिकाण व वर्णन

येलूर हे गांव पुणे-बेंगलोर महामार्ग क्रमांक ४ च्या पश्चिमेला ३ कि.मी. अंतरावर असून सांगली या जिल्हयाच्या ठिकाणापासून ५० कि.मी. व तालुक्याच्या ठिकाणापासून १५ कि.मी. अंतरावर आहे. या गांवी एस.टी.वाहतुकीची, वीजेची,

दूरध्वनीची, बँकेची सोय आहे. तसेच ग्रामपंचायत, दुध संकलन केंद्र, स.से.सोसायटी, सार्वजनिक वाचनालय, वगैरे सोयी आहेत. नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे गांवास पाण्याचा पुरवठा केला जातो. गांवची एकूण लोकसंख्या ५००२ इतकी आहे. गावात माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षणाची सोय असून सरकारी व खाजगी दवाखान्याची सेवाही उपलब्ध आहे. गांवच्या खातेदारांची एकूण संख्या ११०० इतकी आहे व गांवच्या एकूण१२४२ हेक्टर लागणीलायक क्षेत्रापैकी जिरायत ११३० हेक्टर व बागायत ११२ हेक्टर क्षेत्र आहे. गांवचा एकूण आकार रुपये ६,८००=०० आहे. गांवचा कमाल हेक्टरी आकार जिरायत व बागायत क्षेत्राचा रुपये ९=८८ व तरी क्षेत्राचा रुपये २६=२५ इतका आहे. या गांवी प्रत्येक शनिवारी आठवडा बाजार भरतो.

संपादनाखालील जमीन येलूर गांवापासून लांब आहे.भविष्य काळामध्ये जमिनीचा वापर बिनशेतीकडे होईल असे वाटत नाही. तशा सोई सवलती उपलब्ध नाहीत. प्रत्यक्ष पाहणीमध्ये संपादित जमिनीमध्ये किंवा सभोवर घरे बांधणेची शक्यता नाही. म्हणून संबंधीत जमिनी हया शेत जमिनी आहेत. असे किंमती निश्चित करताना धरले आहे. संपादनाखाली असलेल्या जमिनी हया गट नंबर १२९१ मधील जिरायत-बागायत व १३९५ मधील जिरायत मध्यम तांबूस आहे.

वर्णन

अ. नं.	सर्व्हे / गट नंबर	क्षेत्र हेक्टर आर	आकार रुपये पैसे
१]	१२९१ पैकी	०.७५	२.८१
	खराबा	०.०७	
२]	१३९५ पैकी	०.४६	०.८०

जमिनीची प्रत

संपादनाखालील जमिनीचा आकार, जमिनीची प्रत व उत्पादनक्षमता विचारांत घेवून गांवचे आकारप्रमाणे खालील गट पाडणेत आले आहेत.

आकारप्रमाणे गट	आकार
१	रु. ०.०१ ते १.२५
२	" १.२६ ते २.५०
३	" २.५१ ते ३.५०
४	" ३.५१ ते ५.००
५	" ५.०१ ते ७.५०
६	" ७.५१ ते १०.००
७	" १०.०१ ते १२.५०
८	" १२.५१ ते पुढे

पोट खराब

संपादित जमिनीपैकी गट नंबर १२९१ मध्ये पोट खराब क्षेत्र ०-०७ आर आहे. या पोट खराब क्षेत्राचे मुल्य भूसंपादन कायदा कलम प्रमाणे आकारण्यात आले आहे. ती हेक्टरी रु. 200/- प्रमाणे 0-07 क्षेत्राचे रु. 14=00 एकूण किंमतीत समाविष्ठ केलेली आहे.

हक्क

काही नाहीत.

हक्कासाठी पुरक पुरावा

हितसंबंधी इसमानी जे भूसंपादन कायदा कलम ९ चे नोटीशीपैकी हजर होते त्यांनी संपादनाखालील जमिनीचे किंमतीबद्दल कोणताही पुरावा हजर केला नाही.

संपादन मंडळाचा पुरावा

संपादन मंडळाने संपादनाखालील जमिनीचे किंमतीबद्दल कोणताही पुरावा हजर केला नाही.

संपादनाखालील जमिनीची पंचानुमते किंमत

संपादनाखालील जमिनीच्या गट नं. १२९१ पैकी जमिनीची हेक्टरी किंमत रुपये २५,०००/- व गट नं. १२९५ चे जमिनीची किंमत प्रतिहेक्टरी रुपये ४०,०००/- करणेत आलेली आहे. तथापि सदरच्या प्रतिहेक्टरी केलेल्या किंमती अयोग्य वाटतात. म्हणून त्याचा विचार करता येत नाही.

संपादनाखालील जमिनीचे मुल्यांकन [बाजारभाव मुल्यांकन पध्दती]

जमिनीची बाजारभावाप्रमाणे किंमत करणे ही एक शास्त्रोक्त कला आहे. बाजारभाव म्हणजे बंधनरहित विक्रेता व बंधनरहित खरेदीदार यांच्यामध्ये वाटाघाटी होवून जी किंमत ठरली जाते त्या किंमतीला बाजारभावाची किंमत असे समजले जावून त्या किंमतीच्या आधारावर संपादित होणाऱ्या जमिनीची किंमत करणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारचे खरेदी विक्रीचे नोंदणीकृत व्यवहार हे संपादित होणाऱ्या जमिनीच्या गांवामधील आणि त्या गांवच्या परिसरांत येणाऱ्या इतर गांवामधील परंतु संपादित होणाऱ्या जमिनीच्या प्रतिच्या सारख्याच जमिनीचे नोंदणीकृत व्यवहार विचारांत घेणे आवश्यक आहे. या सर्व व्यवहारांचा कायदेशीरपणा, खरे-खोटेपणा, स्थानिक परिस्थिती, भू संपादन होणाऱ्या जमिनीचे फायदे-तोटे इत्यादींचा विचार करुन उर्वरित निवडक व्यवहारांचा तुलनात्मक अभ्यास आणि छाननी करुन येणारी किंमत ही विचारात घेणे आवश्यक आहे. ही सर्व मार्गदर्शक तत्वे आणि भूसंपादन कायद्यातील तरतुदी विचारांत घेवून आम्ही किंमती ठरविल्या आहेत.

मुल्यांकन करण्यासाठी भूसंपादित होणाऱ्या जमिनीचे आकारानुसार आठ गटामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. या गांवचा जिरायत जमिनीचा कमाल आकार दर हेक्टरी रुपये २६=२५ इतका आहे.

संपादनाखालील जमिनीचे मुल्यांकन ठरविणेची तारीख म्हणजे भूसंपा कायदा कलम ४ अन्वये प्रसिध्द झालेली अधिसूचनाअंतिमरित्या ज्या तारखेस प्रसिध्द झाली ती धरुन मुल्यांकन करणेचे आहे. या कामी सदर अधिसूचना दिनांक २८.६.८४ रोजी प्रसिध्द झाली आहे. म्हणजे दिनांक २८.६.८४ रोजी संपादनाखालील जमिनीचे मुल्य काय होते हे ठरविणेचे आहे.

या निवाडयात संपादन होणारी जमीन ही मौजे येलून यावची आहे. त्यामुळे या गावामधील संपादन होणा-या जमिनीचे आसपास लगत असर गावामधील इतर जमिनीचे इतर नोंदणीकृत व्यवहार मार्गदर्शनार्थ उपलब्ध करुन घेतलेले आहेत. असे एकूण ५६ नोंदणीकृत व्यवहार उपलब्ध झाले झाले आहेत. एकंदर व्यवहारांची किंमतीबाबतची दिशा लक्षात घेता या सर्व व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारची एकसुत्रता दिसून येत नाही. त्यामुळे आधारभूत तारखेनंतरचेसुध्दा व्यवहार तपासणी करण्यात आलेली आहेत. परंतू त्याचासुध्दा मार्गदर्शनासाठी फारसा उपयोग होत नाही त्यामूळे निवडक अशा वेगवेगळ्या गटामधील दोन तीन व्यवहारावरती किंमत ठरविण्यात आली आहे. या सर्व व्यवहारांचा गटवार तक्ता खालीलप्रमाणे

अ.नं.	गटनंबर	विक्रीचे क्षेत्र हे. आर	हिस्सा	आकार रु.पैसे	खरेदीची तारीख	विक्रीची किंमत	हेक्टरी आकार	हेक्टरी किंमत
१x	२	३	४	५	६	७	८	९
१	८५६	२-४९	१/२	२२-८७	११.६.७९	७०००/-	९-१५	५६४५/-
२	३९६	०-८०	विहीर	९-६९"	२५.९.७९	२५०००/-	११-१०	२९६८७/-
	३९७	०-०५	पाणीसह	०-२५"				
३	८५६	२=४९	०-२-८	२२-८७	१३.१२.७९	५०००/-	९-१४	१२१४८/-
४	८८७	२=१४		३-१९	१०.१.८०	६०००/-	१-४९	२८०८/-
५	८०२	०-२१		०-४४	१८.२.८०	२०००/-	२-०९	९५७१/-
६	१०८७/७	०-१४		१-५६	१२.३.८०	४५००/-	११-१३	३२१४२/-
७	१४९३	२-५८	स्पै	२-७७	२७.६.८०	९००/-	१-०८	३००००/-
८	६८७	०-८६		९-८७	२२.१२.८०	२००००/-	११-४५	२३२५५/-
९	१००४	२-३७	०-५-४	१०-६२	२३,१.८१	७०००/-	४-४३	८८७३/-
१०	१५७९	१-९५	०५०-२	१-४४	१७.२.८१	२००/-	१-२४	६६६६/-
११	७७६	१-९५	१/२	३-३१	११.२.८१	१४०००/-	१-६९	१६२१८/-
१२	६६३	०-२४	०-५-४	२-९४	३१.३.८१	३२००/-	१२=२५	४००००/-
१३	६७८	०-८६	०-५-४	१०-३७	१०.४.८१	८५००/-	११-९७	३१४९६/-
१४	९४८	४-५९	१/४	९-३१	१४.५.८१	४५००/-	२-०३	४०१८/-
१५	१२९२	१-६५	०-५-४	८-११	११.६.८१	३०००/-	५-०५	५४५५/-
१६	७७१	०-९३	०-५-२	९-११	२१.६.८१	१०००/-	९-८६	३००००

१	२	३	४	५	६	७	८	९
१७	१५६६	०-४०	०-५-४	४-७५	३०.६.८१	८०००/-	११-७०	
१८	७७६	१-१५	१/२	३=३१	५.१०.८१	१४०००/-	१-७०	१४४३२/-
१९	१७५	०-३३	४आणे विहीरपाणी	३-८७	२२.११.८१	३०००/-		
२०	१३२१	१-०१		१-७५	१.१२.८१	२०००/-	१-७४	१९८१/-
२१	१४००	१-६८		१-८१	२२.१२.८१	१५०००/-	१-०७	८१२८/-
२२	८५५ ८५४	०-५१ ०-५१	०-८-०	०-७२ : ०-८१ :	१८.१.८२	३०००/-	१-४२ १२५४२	५६६०/-
२३	१८७	०-६६		८-००	२३.३.८२	२०००/-	१२-१२	३०३०/-
२४	१६८ [illegible]	०-२४ ०-०४	विहीर पाणी	२-८७ : ०-३४ :	२२.३.८२	७०००/-		
२५	६३०	०-२८		२-७५	२१.३.८३	५०००/-	१-८२	१७८५७/-
२६	११२१	१-३५	विहीर	८-११	२१.३.८२	४००००/-		
२७	१५६६	०-४०	०-५=४	४-७५	३.५.८२	८०००/-		
२८	१४८	४-५१		१-३१	२६.५.८२	५०००/-	२-०३	१०८७
२९	४२३ ४२२	०-३४ ०-०१	१/२	४-२५ : ०-०१ :	१४.६.८२	५०००	१२-५० १-००	२७७७०/-
३०	१०८५/२१ १०८५/२५	०-७१ ०-०१		३-१७ : ०-०१ :	२१.६.८२	३००००/-	४-४६	३२५००/-
३१	१ ००४	२-३७	०-२-८	१०-६२	१५.१.८२	५०००/-	४-४४	१२५००/-
३२	४१४	१ -०१	०-४-३	११-५०	१०.१.८३	२०००/-		
३३	६७८	०-८६	०-५-४	१०-३७	११.१.८३	३०००/-	१०-०२	११११११/-
३४	११०६	०-५७	०-१४-६	५-७५	२४.१.८३	४०००/-	१०-०८	७६१२/-
३५	१३२८	०-७१	०-८-०	०-८०	२४.१.८३	७०००/-	१-१३	२००००/"
३६	१६१	०-१६		१-६१	३.३.८३	१००००/-	१०-५६	६२५००/-
३७	११७३	०-०५		०-४१	२१.४.८३	४०००/-	८-२०	८००००/-
३८	७६८	०-४०		२-८१	१७.५.८३	५०००/-	७-०१	१२५००/-
३९	३७१	०-१६	०-८-०	२-००	२५.५.८३	३०००/-	१२-५०	३७५००/-
४०	६७५	०-८१		१०-००	३.६.८३	१००००/-	१२-३४	१२५००/-
४१	३७७	०-३७	८ आणे	३-३१	१.६.८३	४०००/-		
४२	१२०८	०-३३	८ आणे	३-३१	१७.६.८३	१००००/-		
४३	१४८०	०-१६		०-५१	५.८.८३	१०००/-	३-६१	६२५०/-
४४	१८२१	०-५६	०-२३पै	४=२२	१०.८.८३	३०००/-	७-४१	१३०४३/-
४५	८२०	०-८४	०-२३पै	५-५६	१०.८.८३	३०००/-	६-६२	~~४४४४४~~ १३०४३/-
४६	६१३	०-५०	८ आणे	५-१२	२२.८.८३	१००००/-	१०-२४	४००००/-
४७	६०३	०-७८		४-१४	२१.८.८३	१००००/-	६-२०	१५६४०/-
४८	१२१६ १२१८	०-१० ०-०१	[illegible]	[illegible] ०-१६	३.१.८३	२०००/-	१६-०० १८-०८	१०५२६

१	२	३	४	५	६	७	८	९
४९	१०७३	०–२०		०–३७	७.११.८३	५०००/-	१–८५	२५०००/-
५०	१ ३४	०–३९	०–१३–२	२–५०	२१.११.८३	१५०००/-	६–३०	४५४५५/-
५१	५३२	०–१४	विहीर	१–४७	१७.१२.८३	१६०००/-		
५२	३५७	०–३८		४–८७	१७.१२.८३	१७०००/-	१२–५०	४४६३६/-
५३	२७५	०–३३	४ आणे	३–८४	२७.१२.८३	३०००/-	११–६३	३८५००/-
५४	१७५	०–०८	विहीर	१–०२	१५.३.८४	३०००/-		
५५	३५८	०–२६		३–१२	५.६.८४	२०००/-	१२=००	७६९२/-
५६	६११	०–२५		१–५६	५.६.८४	२०००/-	६–२४	८०००/-

५ ५ ५ ५ ५ ५ ५ ५ ५ ५ ५ ५

या निवाडयामध्ये संपादित होणाऱ्या जमिनी ह्या ग्रुप नं.२ व ३ मधील आहेत म्हणून आपण या ग्रुप (२व३) मधील जमिनींच्या व्यवहारांचीच किंमत ठरवीणेसाठी विचार करावयाचा आहे. वरील खरेदी विक्री व्यवहारांच्या तक्त्यापैकी क्र.४,५,७, ११,१४,१८,२०,२२,२८ व ४९ हे एकूण १० व्यवहार ग्रुप नं. २ च्या जमिनीचे आहेत. ग्रुप नं. ३ च्या जमिनीचे व्यवहार या गावी झालेले नाही.त

यापैकी ग्रुप नं. २ च्या जमिनीमध्ये झालेल्या १० व्यवहारांची छाननी केली असतां क्र.४,२० व २८ चे व्यवहार कमी किंमतीचे आणि क्र.११ व १८ चे व्यवहार जादा किंमतीचे असलेने गरजेपोटी झालेचे स्पष्ट होते म्हणून किंमत ठरविणेचे कामी विचारांत घेता येत नाहीत. तसेच क्र.५,७,२२ व ४९ चे व्यवहार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे असलेने वगळणेत येत आहेत. आता बाकी राहीलेला क्र.१४ चा व्यवहार पाहू. ग.नं. ९४८ क्षेत्र ४ हे.५९ आर. पैकी १/४ म्हणजे १–१५ आर क्षेत्रास रु. ४५००/- किंमत देवून दि. १४.५.८१ रोजी घडलेला आहे. हा व्यवहार म्हणजे सन १९८१ मध्ये या जमिनीला हेक्टरी रुपये ४०१८/- किंमत मिळाली आहे. दि. १४.५ ८१ ते २८.६.८४ हा तीन वर्षाचा कालावधी आहे. या तीन वर्षांचे काळांत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढलेल्या आहेत. त्याप्रमाणे जमिनीच्या किंमतीतहि वाढ झालेली आहे. किंमतीमधील ही वाढती प्रवृत्ती व सुधारित भूसंपादन कायद्यातील तरतूदी यांचा साकल्याने विचार करुन या ग्रुप मधील जमिनीला आधारभूत तारखेला दर हेक्टरी किंमत रु. ८०००/- (रुपये आठ हजार फक्त) देणेचा आम्ही निर्णय घेत आहोत.

ग्रुप नंबर ३

येलूर या गावी पांच वर्षांचे मुदतीमध्ये जे खरेदी विक्रीचे नोंदणीकृत व्यवहार झाले आहेत ते पहाता ग्रुप नं. ३ चे जमिनीमधील एकहि व्यवहार झालेचे आढळ होत नाही. म्हणून ग्रुप नं. २ च्या जमिनीपेक्षा ग्रुप नं. ३ ची जमीन चांगली आहे हे नाकारता येत नाही. म्हणून ग्रुप नं. २ चे जमिनीपेक्षा ग्रुप नं. ३ चे जमिनीला दर हेक्टरी किंमत जादा देणे क्रमप्राप्त आहे. म्हणून या ग्रुपमधील जमिनीला दर हेक्टरी किंमत रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) देणेचा आम्ही निर्णय घेत आहोत.

215

संपादनाखालील जमिनीवरील बोजे

संपादित जमिनीच्या ७/१२ ला इतर हक्कात वि.का.स.सोसायटी नं. २ चा व श्री. बबन व जयवंत निवृत्ती खोत यांना साठेखत लिहून दिलेचा उल्लेख आहे. मात्र बोजाची रक्कम किती आहे याची नोंद नाही. नुकसान भरपाई आदा करतेवेळी नियमाप्रमाणे जरूर ती कार्यवाही करणेत येत आहे.

संपादनाखालील जमिनीतील कुळे

संपादित जमिनीत कुळे नाहीत.

भरपाई भत्ता

संपादनाखालील जमिनीची येणारी बाजारभावाची रक्कम भरपाई म्हणून दिली जाते त्यामध्ये झाडे जमीन इमारती व बांधकामे यांचे किंमतीचा समावेश होतो त्या रक्कमेवर ३० टक्के भरपाई भत्ता देणेबद्दल भूसंपादन कायदा १८८४ व दुरु दुरुस्त कायदा १९८४ कलम क्रमांक २३(१अ) व २३(२) मध्ये तरतूद केली आहे. तसेच सदर कायदयामधील तरतूदीनुसार १२ टक्के विशेष भत्ता म्हणून संपादनाखालील जमिनीचे बाजार मुल्यावर कलम ४ ची अधिसूचनेच्या तारखेपासून किंवा संपादनाखालील जमिनीचा कब्जा ज्या तारखेस घेतला आहे. त्यापैकी आधीची असेल तेव्हापासून ते जमिनीचा निवाडा जाहीर होईल त्या तारखेपर्यंत देणेचा आहे.

कब्जा

संपादनाखालील जमिनीचा कब्जा भूसंपादन कायदयाचे तरतूदीखाली संपादन मंडळास दिलेला नाही.

आगाऊ नुकसान भरपाई

संपादनाखालील जमिनीतील खातेदारांना आगाऊ नुकसान भरपाई दिलेली नाही.

117

मुल्यांकनाचा तपशील

१) जमिनीची किंमत	रुपये ११,६६४-००
२) बांधकामाची किंमत	रुपये — —
३) विहीरीची किंमत	रुपये — —
४) ३० टक्के भरपाई भत्ता	रुपये ३,३९८-२०
५) १२ टक्के वार्षीक विशेष भत्ता	रुपये ३,५८२-१०
एकूण	रुपये १८,१३४-३०

एकूण रक्कम रुपये १८,१३४-३० (रुपये आठरा हजार एकशो चौतीस पैसे तीस) फक्त.

" नि वा डा

मी याद्वारे भूसंपादन कायदा १८८४ व दुरुस्त १९८४ कलम ११ अन्वये असे घोषीत करतो की.

१) संपादनाखालील जमिनीचे खरे क्षेत्र हे, आर १-२८ इतके आहे.

२) देय असलेली भरपाई एकूण रक्कम रुपये १८,१३४-३० (रुपये आठरा हजार एकशो चौतीस पैसे तीस फक्त) इतकी आहे.

३) संविभाजन सोबत जोडलेल्या संविभाजन पत्रकाप्रमाणे केले आहे.

संपादनाखालील जमिनी अंतिमरित्या संपादित झाल्या असून, त्या त्यावरील बोजा हक्क किंवा सत्ता प्रकार कायदेशीर एखादे इसमाचे हक्क असतील, शासनाचे हक्क व्यतिरीक्त विरहीत महाराष्ट्र शासनाचे मालकीच्या झाल्या आहेत.

असे समजणेत यावे.

ठिकाण : सांगली

दिनांक २७-२-८७

विशेष भुमि संपादन अधिकारी
नं. ११ सांगली.

क्रमांक विभूसं-११/ एसआर १८३
विशेष भूमी संपादन अधिकारी नं. ११
सांगली यांचे कार्यालय,
महसुल भवन , मिरज. जि. सांगली.
तारीख :-

नि वा डा

[१] निवाड्याचे शिर्षक

वारणा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी मौजे येलूर, ता. वाळवा, जि. सांगली येथील लाभक्षेत्रातील जमिनीचे संपादन.

[२] भू संपादन कायदा १८८४ व दुरुस्त कायदा १९८४, कलम ४ व ६ च्या अधिसुचनेचा तपशील.

[अ] कलम ४ ची अधिसुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रांत तारीख २८.६.१९८४ रोजी पान नं. २०२० वर क्रमांक विभूसं-११/एसआर १८३, दिनांक १३.६.१९८४ अन्वये प्रसिध्द झाली.

[ब] स्थानिक वृतपत्रांत मराठी भाषेमध्ये खालीलप्रमाणे प्रसिध्दी झाली.
--

[क] अधिसुचनेचा मतितार्थ जाहीररित्या स्थानिक सोईस्कर ठिकाणी प्रसिध्द केला त्याचा तपशील.

१]	मिरज कार्यालय	-
२]	तहसिल कार्यालय वाळवा	१२.७.१९८४
३]	जिल्हाधिकारी कार्यालय सांगली	-
४]	मौजे येलूर गांवचे नोटीस बोर्डवर	१२.७.१९८४

[३] कलम ६ चे अधिसुचनेचा तपशील.

[अ] कलम ६ ची अधिसुचना महाराष्ट्र राज्य शासनाचे राजपत्रांत पान नं. २७५० वर दिनांक ७.११.१९८५ रोजी क्रमांक भूसं / आरआर - १२७६ / सां. / ८५ ने प्रसिध्द झाली आहे.

ब] स्थानिक वृतपत्रात मराठीतून प्रसिध्दी दिलेचा तपशील.

	वृतपत्राचे नांव	प्रसिध्दीची तारीख
१]	दैनिक प्रतिध्वनी	२७.११.१९८५
२]	दैनिक मतवादी	२७.११.१९८५